रजिस्ट्री सं. डी. 281

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग 1

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 1] नई दिल्ली, नवंबर 12-18, 2020/21-27, कार्तिक (शक) 1942 [खंड 19
No. 1] NEW DELHI, NOVEMBER 12-18, 2020/21-27, KARTIK (SAKA) 1942 [Vol. 19
अं. १] नवी दिल्ली, नोव्हेंबर १२-१८, २०२०/२१-२७, कार्तिक (शके) १९४२ [खंड १९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली,

(1) दि मुसलमान वक्फ एक्ट, 1923, (2) दि इंडस्ट्रियल डिस्प्युटस् (बैकींग अॅण्ड इन्श्युरन्स कंपनीज्) एक्ट, 1949, (3) दि अॅडव्होकेट'स् वेल्फेअर फण्ड एक्ट, 2001, (4) दि प्रोटेक्शन ऑफ वूमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हॉयलन्स एक्ट, 2005, (5) दि कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राईटस् एक्ट, 2005, (6) दि नॅशनल ग्रीन ट्रिब्यूनल एक्ट, 2010 के मराठी अनुवाद राष्ट्रपती के प्राधिकार से प्रकाशित किये जाते है और ये प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खण्ड (क) के अधीन उनके मराठी प्राधिकृत पाठ समझे जायेंगे।

नि

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi,

The Translation in Marathi of (1) The Mussalman Wakf Act, 1923, (2) The Industrial Disputes (Banking and Insurance Companies) Act, 1949, (3) The Advocates' Welfare Fund Act, 2001, (4) The Protection of Women from Domestic Violence Act, 2005, (5) The Commissions for Protection of Child Rights Act, 2005, (6) The National Green Tribunal Act, 2010 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 (50 of 1973).

## विधि व न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नवी दिल्ली,

(१) दि मुसलमान वक्फ अॅक्ट, १९२३, (२) दि इंडस्ट्रियल डिस्प्युटस् (बँकिंग अॅण्ड इन्श्युरन्स कंपनीज्) अॅक्ट, १९४९, (३) दि अॅडव्होकेटस्' वेल्फेअर फंड अॅक्ट, २००१, (४) दि प्रोटेक्शन ऑफ वूमेन फ्रॉम डोमेस्टिक व्हॉयलन्स अॅक्ट, २००५, (५) दि कमिशन्स फॉर प्रोटेक्शन ऑफ चाइल्ड राईटस् अॅक्ट, २००५, (६) दि नॅशनल ग्रीन ट्रिब्यूनल अॅक्ट, २०१० यांचा मराठी अनुवाद याद्वारे, राष्ट्रपतीच्या प्राधिकारान्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि तो, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ५०) याच्या कलम २ च्या खंड (क) अन्वये मराठीतील त्यांचा प्राधिकृत पाठ असल्याचे मानण्यात येईल.

# बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५

## (२००६ चा अधिनियम क्रमांक ४)

[२६ जुलै, २०१९ रोजी यथाविद्यमान]

[२० जानेवारी, २००६.]

**बाल हक्कांच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय आयोग व राज्य आयोग घटित करण्याकरिता आणि बालकांच्या संबंधातील अपराधांची किंवा बाल हक्कांच्या उल्लंघनाची शीघ्र न्यायचौकशी करण्यासाठी बाल न्यायालये घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** १९९० मध्ये संयुक्त राष्ट्र (युएन) महासभेच्या शिखर परिषदेमध्ये भारत सहभागी झाला होता, जीमध्ये बालकांचे उत्तरजीवित्व, संरक्षण व विकास यांबाबतच्या घोषणेचा स्वीकार करण्यात आला होता ;

**आणि ज्याअर्थी,** भारताने ११ डिसेंबर, १९९२ रोजी बाल हक्कांच्या अभिसंधीला देखील संमती दिलेली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** बाल हक्क अभिसंधी (सीआरसी) हा एक आंतरराष्ट्रीय करार असून, (त्यानुसार) त्यात नमूद केलेल्या बाल हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलणे हे स्वाक्षरीकर्त्या राष्ट्रांचे अवश्यकर्तव्य ठरते ;

**आणि ज्याअर्थी,** बाल हक्कांच्या संरक्षणाची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने सरकारने अलीकडेच बालकांसाठी हाती घेतलेल्या उपक्रमांपैकी एक उपक्रम म्हणजे बालकांकरिता राष्ट्रीय सनद, २००३ चा स्वीकार, हा होय ;

**आणि ज्याअर्थी,** मे, २००२ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या बालकांसंबंधातील विशेष अधिवेशनामध्ये " बालकांसाठी अनुरूप जग " या शीर्षकाचा निष्पन्न दस्तऐवज स्वीकृत करण्यात आला, ज्यामध्ये सदस्य देशांची चालू दशकातील, ध्येये, उद्दिष्टे, धोरणे व त्यांनी हाती घ्यावयाचे कृतिकार्यक्रम या गोष्टी अंतर्भूत आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** याबाबतीत सरकारने स्वीकृत केलेली धोरणे, बाल हक्क, अभिसंधीत विहित केलेली मानके आणि इतर सर्व संबद्ध आंतरराष्ट्रीय संलेख अंमलात आणण्यासाठी बालकांशी संबंधित कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण एक

### **प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ असे म्हणावे.

(२) तो, जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतास लागू आहे.

(३) तो, केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास [1]अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) " अध्यक्ष " याचा अर्थ, आयोगाचा किंवा, यथास्थिति, राज्य आयोगाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ख) " बाल हक्क " यामध्ये, २० नोव्हेंबर, १९८९ रोजी संयुक्त राष्ट्राच्या बाल हक्क अभिसंधीत स्वीकृत केलेले आणि [११ डिसेंबर, १९९२ रोजी भारत सरकारने अनुसंमती दिलेले बालकांचे हक्क, अंतर्भूत आहेत;

(ग) " आयोग" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेला राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, असा आहे;

(घ) "सदस्य" याचा अर्थ, आयोगाचा किंवा, यथास्थिति, राज्य आयोगाचा सदस्य असा आहे, आणि त्यात अध्यक्षाचा समावेश होतो;

(ङ) "अधिसूचना" याचा अर्थ, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे;

(च) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(छ) "राज्य आयोग" याचा अर्थ, कलम १७ अन्वये घटित करण्यात आलेला राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, असा आहे.

---

[1] पहा. अधिसूचना क्र. स्था. आ. २२९(ई) दिनांक १५ फेब्रुवारी, २००७. पहा भारताचे राजपत्र, असाधारण, भाग दोन, क. ३ (दोन), दिनांक ५ फेब्रुवारी, २००७.

## प्रकरण दोन

## राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग

बालहक्क संरक्षणासाठी राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग घटित करणे.

**३.** (१) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, " राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग " या नावाने ओळखण्यात येणारा एक निकाय या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व नेमून देण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी घटित करील.

(२) हा आयोग पुढील सदस्यांचा मिळून बनलेला असेल :—

(क) अध्यक्ष, जी विख्यात व्यक्ती असेल आणि जिने बालकल्याणाला चालना देण्यासाठी लक्षणीय कार्य केलेले असेल ; आणि

(ख) केंद्र सरकारने,—

(एक) शिक्षण ;

(दोन) बालकांचे आरोग्य, त्यांची देखभाल, कल्याण किंवा बालविकास ;

(तीन) बाल न्याय किंवा दुर्लक्षित वा उपेक्षित (मार्जिनलाईज्ड) बालकांची किंवा विकलांग बालकांची देखभाल ;

(चार) बालमजुरी निर्मूलन किंवा आपदग्रस्त बालके ;

(पाच) बालमानसशास्त्र किंवा समाजशास्त्र ; आणि

(सहा) बालकांसंबंधीचे कायदे ;

या क्षेत्रांतील प्रभुत्व क्षमता, सचोटी, प्रतिष्ठा आणि अनुभव असलेल्या व्यक्तींमधून, नियुक्त करावयाचे सहा सदस्य, ज्यांपैकी किमान दोन सदस्य ह्या महिला असतील.

(३) आयोगाचे कार्यालय दिल्ली येथे असेल.

**अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती.**

**४.** केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे अध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती करील :

परंतु असे की, अध्यक्षाची नियुक्ती, [१][ महिला व बाल विकास विभागाच्या किंवा मंत्रालयाच्या प्रभारी मंत्र्याच्या ] अध्यक्षतेखाली केंद्र सरकारकडून घटित करण्यात आलेल्या त्रिसदस्य निवड समितीच्या शिफारशीनुसार करण्यात येईल.

**अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी आणि सेवाशर्ती.**

**५.** (१) अध्यक्ष व प्रत्येक सदस्य, हा, ज्या दिनांकास पद ग्रहण करील त्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील :

परंतु असे की, कोणताही अध्यक्ष किंवा सदस्य दोन पदावधींपेक्षा अधिक कालावधीसाठी पद धारण करणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणताही अध्यक्ष किंवा इतर कोणताही सदस्य,

(क) अध्यक्षाच्या बाबतीत, वयाची पासष्ट वर्षे ; आणि

(ख) सदस्याच्या बाबतीत, वयाची साठ वर्षे,

पूर्ण झाल्यानंतर पद धारण करणार नाही.

(२) अध्यक्ष किंवा सदस्य याला, कोणत्याही वेळी, केंद्र सरकारला उद्देशून आपल्या पदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल.

**अध्यक्ष व सदस्य यांचे वेतन व भत्ते.**

**६.** अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, केंद्र सरकारकडून विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील :

परंतु असे की, अध्यक्ष किंवा, यथास्थिति, सदस्य याच्या नियुक्तीनंतर एकतर त्याचे वेतन व भत्ते किंवा त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, यांमध्ये त्याला अहितकारक होतील असे बदल केले जाणार नाहीत.

---

१. २००७ चा अधिनियम क्रमांक ४, क. २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला (२९ डिसेंबर, २००६ रोजी व तेव्हापासून).

७. (१) पोटकलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, अध्यक्षाला, सिद्ध झालेली गैरवर्तणूक किंवा अक्षमता या कारणावरून केंद्र सरकारच्या आदेशाद्वारे, पदावरून दूर करता येईल. पदावरून दूर करणे.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकारला, जर अध्यक्षास किंवा, यथास्थिति, इतर कोणत्याही सदस्यास—

(क) नादार ठरविले असेल ; किंवा

(ख) तो त्याच्या पदावधीमध्ये, त्याच्या पदाच्या कर्तव्याबाहेरील कोणताही वेतनी रोजगार करत असेल ; किंवा

(ग) तो काम करण्यास नकार देत असेल किंवा काम करण्यास असमर्थ ठरला असेल ; किंवा

(घ) तो विकल मनाचा असेल व सक्षम न्यायालयाने तो तसा असल्याचे घोषित केले असेल ; किंवा

(ङ) त्याचे पदावर राहणे, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने हानिकारक ठरेल अशाप्रकारे, त्याने पदाचा दुरुपयोग केला असेल ; किंवा

(च) केंद्र सरकारच्या मते ज्यामध्ये नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव आहे अशा अपराधाबद्दल त्याला दोषी ठरविण्यात आले असेल व त्यासाठी त्याला कारावासाची शिक्षा झाली असेल ; किंवा

(छ) तो आयोगाकडून अनुपस्थित राहण्याबद्दल परवानगी न घेता आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिला असेल तर,

अध्यक्षास किवा इतर कोणत्याही सदस्यास आदेशाद्वारे पदावरून दूर करता येईल.

(३) कोणत्याही व्यक्तीला, त्या बाबतीत आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, या कलमान्वये पदावरून दूर करता येणार नाही.

८. (१) जर अध्यक्ष किंवा, यथास्थिति, सदस्य,— अध्यक्ष किंवा सदस्य यांनी पद रिक्त करणे.

(क) कलम ७ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अनर्हतांपैकी कोणत्याही अनर्हतेस पात्र ठरला असेल ; किंवा

(ख) त्याने कलम ५ च्या पोटकलम (२) अन्वये राजीनामा दिला असेल,

तर त्यानंतर त्याची जागा रिक्त होईल.

(२) अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद प्रसंगतः रिक्त झाल्यास—मग ते त्याचा मृत्यू, राजीनामा या कारणामुळे किंवा अन्य प्रकारे रिक्त झालेले असो—असे रिक्त पद नव्वद दिवसांच्या कालावधीत कलम ४ च्या तरतुदीनुसार नव्याने नियुक्ती करून भरण्यात येईल आणि अशा प्रकारे नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, जिच्या जागेवर तिची अशा प्रकारे नियुक्ती करण्यात आली असेल त्या अध्यक्षाने, किंवा, यथास्थिति, सदस्याने जेवढ्या कालावधीसाठी ते पद धारण केले असते, त्या उर्वरित कालावधीसाठी ते पद धारण करील.

९. (क) आयोगामध्ये कोणतेही पद रिक्त असणे किंवा तो घटित करण्यामध्ये कोणताही दोष असणे ; किंवा रिक्त पदे, इत्यादीमुळे आयोगाची कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

(ख) अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीमध्ये कोणताही दोष असणे ; किंवा

(ग) प्रकरणाच्या योग्यायोग्यतेवर परिणाम न करणारी कोणतीही नियमबाह्यता आयोगाच्या कार्यपद्धतीमध्ये असणे,

केवळ, या कारणांमुळे आयोगाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य ठरणार नाही.

१०. (१) आयोग, अध्यक्षाला योग्य वाटेल अशा वेळी, आपल्या कार्यालयात नियमितपणे बैठक घेईल, परंतु आयोगाच्या मागील व पुढील बैठकीमध्ये तीन महिन्यांपेक्षा अधिक खंड पडणार नाही. कामकाज चालविण्याची कार्यपद्धती.

(२) बैठकीमध्ये सर्व निर्णय बहुमताने घेण्यात येतील :

परंतु असे की, समसमान मते पडल्यास, अध्यक्षास किंवा त्याच्या अनुपस्थितीत अध्यक्षपदी असणाऱ्या व्यक्तीस दुसरे किंवा निर्णायक मत असेल व ती त्याचा वापर करील.

(३) अध्यक्ष जर कोणत्याही कारणामुळे, आयोगाच्या बैठकीला उपस्थित राहण्यास असमर्थ असेल तर, बैठकीला उपस्थित असलेल्या सदस्यांनी, त्यांच्यामधून निवडलेला कोणताही सदस्य बैठकीच्या अध्यक्षपदी असेल.

(४) आयोग, आपल्या बैठकीचे कामकाज करण्याच्या संबंधात केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येतील, अशा बैठकीच्या गणपूर्तीसह कार्यपद्धतीविषयक नियमांचे पालन करील.

(५) आयोगाचे सर्व आदेश व निर्णय, सदस्य-सचिवाकडून किंवा सदस्य-सचिवाने याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या आयोगाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

आयोगाचे सदस्य-सचिव, अधिकारी व इतर कर्मचारी.

**११.** (१) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, भारत सरकारच्या सह सचिवाच्या किंवा अपर सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची, आयोगाचा सदस्य-सचिव म्हणून नियुक्ती करील आणि आयोगास आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडता यावीत याकरिता आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी त्यास उपलब्ध करून देईल.

(२) सदस्य-सचिव हा, आयोगाच्या कामकाजाच्या योग्य प्रशासनाकरिता व त्याच्या दैनंदिन व्यवस्थापनाकरिता जबाबदार असेल आणि तो केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व त्यांचे पालन करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(३) आयोगाच्या प्रयोजनासाठी नियुक्त करण्यात आलेले सदस्य-सचिव, इतर अधिकारी व कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येतील, त्याप्रमाणे असतील.

**वेतन व भत्ते अनुदानातून देणे.**

**१२.** अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि प्रशासकीय खर्च तसेच कलम ११ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले सदस्य-सचिव, इतर अधिकारी व कर्मचारी यांना देय असलेले वेतन, भत्ते व निवृत्तिवेतन कलम २७ च्या पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या अनुदानातून प्रदान करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## आयोगाची कार्ये व अधिकार

**आयोगाची कार्ये.**

**१३.** (१) आयोग, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कार्ये पार पाडील :—

(क) बाल हक्कांच्या संरक्षणाकरिता त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये तरतूद केलेल्या संरक्षक उपाययोजनांची तपासणी करणे व त्यांचा आढावा घेणे आणि त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजनांची शिफारस करणे ;

(ख) आयोगाच्या संरक्षक उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबतचे अहवाल केंद्र सरकारकडे दरवर्षी आणि आयोगास योग्य वाटेल अशा अन्य कालांतराने सादर करणे ;

(ग) बाल हक्कांचे उल्लंघन झाल्याच्या प्रकरणांची चौकशी करणे व अशा प्रकरणांत कार्यवाही सुरू करण्याची शिफारस करणे ;

(घ) दहशतवाद, जातीय हिंसाचार, दंगली, नैसर्गिक आपत्ती, कौटुंबिक हिंसाचार, एचआयव्ही/एडस्, अपव्यापार, वाईट वागणूक, छळ व पिळवणूक, संभोगचित्रण आणि शरीरविक्रय यांनी बाधित झालेल्या बालकांना त्यांच्या हक्कांचा उपभोग घेण्यास आडकाठी आणणाऱ्या सर्व घटकांची तपासणी करणे व योग्य त्या सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करणे ;

(ङ) विशेष देखभालीची व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या तसेच आपदग्रस्त बालके, उपेक्षित व वंचित बालके, कायद्याच्या संघर्षात अडकलेली बालके, बाल गुन्हेगार, कुटुंबहीन बालके व कैद्यांची बालके यांच्या संबंधातील बाबींमध्ये लक्ष घालणे व योग्य त्या सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करणे ;

(च) करार व इतर आंतरराष्ट्रीय संलेख यांचा अभ्यास करणे आणि बाल हक्कांवरील विद्यमान धोरणे, कार्यक्रम व इतर उपक्रम यांचा नियतकालिक आढावा घेणे आणि बालकांसाठी सर्वाधिक हितकारक होईल अशा रीतीने त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी शिफारशी करणे ;

(छ) बाल हक्कांच्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेणे व त्याला चालना देणे ;

(ज) समाजाच्या निरनिराळ्या वर्गांत बाल हक्कांबाबतची जाणीव निर्माण करणे आणि ह्या हक्कांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षक उपाययोजनांबाबत प्रकाशने, प्रसार माध्यमे, चर्चासत्रे व इतर उपलब्ध साधने यांच्याद्वारे जागृती घडवून आणणे ;

(झ) जेथे बालकांना उपचार, सुधारणा किंवा संरक्षण या प्रयोजनाकरिता ठेवण्यात आले असेल किंवा दाखल करण्यात आले असेल असे कोणतेही बाल अभिरक्षागृह किंवा सामाजिक संघटनेद्वारे चालविण्यात येणाऱ्या कोणत्याही संस्थेसह, केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य शासन किंवा कोणतेही इतर प्राधिकरण यांच्या नियंत्रणाखालील, बालकांसाठी असलेली कोणतीही इतर निवासाची जागा किंवा संस्था यांचे निरीक्षण करणे किंवा करावयास लावणे आणि आवश्यकता वाटल्यास, या प्राधिकरणांच्यामार्फत सुधारात्मक कृती करवून घेणे ;

(ञ) पुढील बाबींशी संबंधित तक्रारींची चौकशी करणे आणि त्यांची स्वाधिकारे दखल घेणे,—

(एक) बाल हक्कांपासून वंचित ठेवणे व त्यांचे उल्लंघन करणे ;

(दोन) बालकांचे संरक्षण व विकास यांबद्दलची तरतूद असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी न करणे ;

(तीन) बालकांच्या हालअपेष्टांची तीव्रता कमी करणे व त्यांच्या कल्याणाची सुनिश्चिती करणे, हा उद्देश असलेले धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे किंवा सूचना यांचे अनुपालन न करणे आणि अशा मुलांना सहाय्य करणे,

किंवा अशा बाबींमधून उद्‌भवलेल्या समस्या समुचित प्राधिकरणांच्या मार्फत सोडविणे ; आणि

(ट) बाल हक्कांना चालना देण्याकरिता आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये व वरील कार्यांना आनुषंगिक अशी इतर कोणतीही बाब.

(२) राज्य आयोगासमोर किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये योग्य रीतीने घटित करण्यात आलेल्या इतर कोणत्याही आयोगासमोर प्रलंबित असलेल्या कोणत्याही प्रकरणाची चौकशी आयोग, करणार नाही.

**१४.** (१) आयोगाला, कलम १३ च्या पोटकलम (१) च्या खंड (ञ) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही प्रकरणाची चौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दाव्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार आणि विशेषेकरून पुढील बाबींसंबंधात अधिकार असतील :— चौकशीसंबंधी अधिकार.

१९०८ चा ५.

(क) कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेणे व तो सादर करणे ;

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागविणे ; आणि

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे.

(२) आयोगास, प्रकरणाची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे कोणतेही प्रकरण अग्रेषित करण्याचा अधिकार असेल आणि ज्याच्याकडे असे प्रकरण अग्रेषित करण्यात आले असेल तो दंडाधिकारी जणू काही ते प्रकरण फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम ३४६ अन्वये त्याच्याकडे अग्रेषित करण्यात आले आहे असे समजून आरोपीविरुद्धच्या तक्रारीची सुनावणी करण्याची कार्यवाही करील.

१९७४ चा २.

**१५.** आयोगास, या अधिनियमान्वये करण्यात आलेली चौकशी पूर्ण झाल्यावर पुढीलपैकी कोणतीही उपाययोजना करता येईल :— चौकशीनंतरची उपाययोजना.

(एक) बाल हक्कांचे गंभीर स्वरूपाचे उल्लंघन झाल्याचे किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यांच्या तरतुदींचा भंग झाल्याचे चौकशीत उघड झाले असेल त्याबाबतीत, आयोगाने, संबंधित व्यक्तीविरुद्ध किंवा व्यक्तींविरुद्ध खटला भरण्याची कार्यवाही करण्यासाठी, किंवा त्यास योग्य वाटेल अशी इतर कार्यवाही करण्यासाठी संबंधित शासनाकडे किंवा प्राधिकरणाकडे शिफारस करणे ;

(दोन) सर्वोच्च न्यायालयास किंवा संबंधित उच्च न्यायालयास आवश्यक वाटतील असे निदेश, आदेश किंवा प्राधिलेख त्याच्याकडून प्राप्त करण्यासाठी त्या न्यायालयाकडे जाणे ;

(तीन) पीडित व्यक्तीला किंवा तिच्या कुटुंबातील सदस्यांना आयोगास आवश्यक वाटेल असे अंतरिम साहाय्य देण्यासाठी संबंधित शासनाकडे किंवा प्राधिकरणाकडे शिफारस करणे.

आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल.

१६. (१) आयोग, केंद्र सरकारला व संबंधित राज्य शासनाला, वार्षिक अहवाल सादर करील आणि आयोगाच्या मते जी कोणतीही बाब इतकी तातडीची किंवा महत्त्वाची असेल की, ती बाब वार्षिक अहवाल सादर करीपर्यंत लांबणीवर टाकता येणार नाही, त्या तातडीच्या किंवा महत्त्वाच्या कोणत्याही बाबीवरील विशेष अहवाल, आयोग कोणत्याही वेळी सादर करू शकेल.

(२) केंद्र सरकार आणि यथास्थिति, संबंधित राज्य शासन, आयोगाच्या शिफारशींवर केलेली किंवा करण्याचे प्रस्तावित असलेली कारवाई आणि अशा शिफारशी न स्वीकारण्याची कारणे, कोणतीही असल्यास, स्पष्ट करणाऱ्या ज्ञापनासह, आयोगाचा वार्षिक व विशेष अहवाल, तो प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत, अनुक्रमे संसदेच्या किंवा, यथास्थिति, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

(३) वार्षिक अहवाल, केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा रीतीने तयार करण्यात येईल व त्यात असा तपशील अंतर्भूत असेल.

## प्रकरण चार

## राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

बाल हक्क संरक्षणासाठी राज्य बाल हक्क संरक्षण आयोग घटित करणे.

१७. (१) राज्य शासनास,...... (राज्याचे नाव) बाल हक्क संरक्षण आयोग या नावाने ओळखण्यात येणारा एक निकाय या प्रकरणान्वये, राज्य आयोगाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी घटित करता येईल.

(२) राज्य आयोग पुढील सदस्यांचा मिळून बनलेला असेल,

(क) अध्यक्ष, जी विख्यात व्यक्ती असेल व जिने बाल कल्याणाला चालना देण्यासाठी लक्षणीय कार्य केलेले असेल ; आणि

(ख) राज्य शासनाने,—

(एक) शिक्षण ;

(दोन) बालकांचे आरोग्य, त्यांची देखभाल, कल्याण किंवा बाल विकास ;

(तीन) बाल न्याय किंवा दुर्लक्षित वा उपेक्षित बालकांची किंवा विकलांग मुलांची देखभाल ;

(चार) बाल मजुरी निर्मूलन किंवा आपदग्रस्त बालके ;

(पाच) बाल मानसशास्त्र किंवा समाजशास्त्र ; आणि

(सहा) बालकांसंबंधीचे कायदे,

या क्षेत्रांतील प्रभुत्व, क्षमता, सचोटी, प्रतिष्ठा आणि अनुभव असलेल्या व्यक्तींमधून, नियुक्त करावयाचे सहा सदस्य, ज्यांपैकी किमान दोन सदस्य ह्या महिला असतील.

(३) राज्य आयोगाचे मुख्यालय, राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी असेल.

अध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती.

१८. राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, अध्यक्ष व इतर सदस्य यांची नियुक्ती करील :

परंतु असे की, अध्यक्षाची नियुक्ती, बालकांशी संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली, राज्य शासनाकडून घटित करण्यात आलेल्या त्रिसदस्य निवड समितीच्या शिफारशीनुसार करण्यात येईल.

१९. (१) अध्यक्ष व प्रत्येक सदस्य हा, ज्या दिनांकास पद ग्रहण करील त्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील : अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी आणि सेवाशर्ती.

परंतु असे की, अध्यक्ष किंवा सदस्य दोन पदावधींपेक्षा अधिक कालावधीसाठी पद धारण करणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणताही अध्यक्ष किंवा इतर कोणताही सदस्य—

(क) अध्यक्षाच्या बाबतीत, वयाची पासष्ट वर्षे ; आणि

(ख) सदस्याच्या बाबतीत, वयाची साठ वर्षे,

पूर्ण झाल्यानंतर, पद धारण करणार नाही.

(२) अध्यक्ष किंवा सदस्य याला, कोणत्याही वेळी, राज्य शासनाला उद्देशून, आपल्या पदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल.

२०. अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती, राज्य शासनाकडून विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील : अध्यक्ष व सदस्य यांचे वेतन व भत्ते.

परंतु असे की, अध्यक्ष किंवा, यथास्थिति, सदस्य याच्या नियुक्तीनंतर त्याचे वेतन व भत्ते किंवा त्याच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती यांमध्ये, त्याला अहितकारक होतील असे बदल केले जाणार नाहीत.

२१. (१) राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, राज्य शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची राज्य आयोगाचा सचिव म्हणून नियुक्ती करील आणि आयोगास आपली कार्ये कार्यक्षमतेने पार पाडता यावीत याकरिता आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी त्यास उपलब्ध करून देईल. राज्य आयोगाचे सचिव, अधिकारी व इतर कर्मचारी.

(२) सचिव, राज्य आयोगाच्या कामकाजाच्या योग्य प्रशासनाकरिता व त्याच्या दैनंदिन व्यवस्थापनाकरिता जबाबदार असेल आणि तो, राज्य शासनाद्वारे विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व त्यांचे पालन करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(३) राज्य आयोगाच्या प्रयोजनासाठी नियुक्त करण्यात आलेले सचिव, इतर अधिकारी व कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासनाद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

२२. अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि तसेच प्रशासकीय खर्च कलम २१ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले सचिव, इतर अधिकारी व कर्मचारी यांना देय असलेले वेतन, भत्ते व निवृत्तिवेतन कलम २८ च्या पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या अनुदानामधून प्रदान करण्यात येतील. वेतन व भत्ते अनुदानातून देणे.

२३. (१) राज्य आयोग, राज्य शासनाला वार्षिक अहवाल सादर करील आणि त्याच्या मते, जी कोणतीही बाब इतकी तातडीची किंवा महत्त्वाची असेल की, ती बाब वार्षिक अहवाल सादर करीपर्यंत लांबणीवर टाकता येणार नाही, त्या तातडीच्या किंवा महत्त्वाच्या कोणत्याही बाबीवरील विशेष अहवाल, राज्य आयोग कोणत्याही वेळी सादर करू शकेल. राज्य आयोगाचे वार्षिक व विशेष अहवाल.

(२) राज्य शासन, राज्याशी संबंधित शिफारशींवर केलेली किंवा करण्याचे प्रस्तावित केलेली कारवाई आणि अशा शिफारशींपैकी कोणतीही शिफारस न स्वीकारण्याची कारणे कोणतीही असल्यास, स्पष्ट करणाऱ्या ज्ञापनासह, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले सर्व अहवाल, जेथे राज्य विधानमंडळ दोन सभागृहांनी मिळून बनलेले असेल, तेथे प्रत्येक सभागृहांसमोर आणि जेथे असे विधानमंडळ एका सभागृहाचे मिळून बनलेले असेल तेथे, अशा एका सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

(३) वार्षिक अहवाल, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अशा रीतीने तयार करण्यात येईल व त्यात असा तपशील अंतर्भूत असेल.

२४. कलमे ७, ८, ९, १०, कलम १३ चे पोटकलम (१) आणि कलमे १४ व १५ यांच्या तरतुदी, पुढील फेरबदलांच्या अधीन राहून राज्य आयोगास लागू होतील आणि अंमलात येतील :— राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाशी संबंधित विवक्षित तरतुदी राज्य आयोगांना लागू असणे.

(क) “ आयोग ” या शब्दाच्या निर्देशाचा अन्वयार्थ “ राज्य आयोग ” असा लावण्यात येईल ;

(ख) “ केंद्र सरकार ” या शब्दाच्या निर्देशाचा अन्वयार्थ “ राज्य शासन ” असा लावण्यात येईल ; आणि

(ग) “ सदस्य-सचिव ” या शब्दाच्या निर्देशाचा अन्वयार्थ “ सचिव ” असा लावण्यात येईल.

प्रकरण पाच

## बाल न्यायालय

बाल न्यायालय. **२५.** बालकांविरुद्धच्या अपराधांची किंवा बाल हक्कांच्या उल्लंघनाची शीघ्र न्यायचौकशीची तरतूद करण्याच्या प्रयोजनाकरिता, राज्य शासनास, उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या सहमतीने, उक्त अपराधांची न्यायचौकशी करणारे बाल न्यायालय म्हणून राज्यातील किमान एका न्यायालयास किंवा प्रत्येक जिल्ह्याकरिता एका सत्र न्यायालयास अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येईल :

परंतु असे की, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कायद्यान्वये अशा अपराधांसाठी जर,—

(क) सत्र न्यायालय हे विशेष न्यायालय म्हणून आधीच विनिर्दिष्ट करण्यात आले असेल ; किंवा

(ख) विशेष न्यायालय आधीच घटित करण्यात आले असेल,

तर या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

विशेष सरकारी अभियोक्ता. **२६.** प्रत्येक बाल न्यायालयाकरिता, त्या न्यायालयातील खटले चालविण्याच्या प्रयोजनासाठी विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून राज्य शासन, अधिसूचनेद्वारे, सरकारी अभियोक्ता विनिर्दिष्ट करील, किंवा ज्याने सात वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीकरिता वकिलीचा व्यवसाय केला आहे, अशा अधिवक्त्याची नियुक्ती करील.

प्रकरण सहा

## वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

केंद्र सरकारकडून अनुदाने. **२७.** (१) केंद्र सरकार, संसदेकडून या संबंधात कायद्याद्वारे रीतसर विनियोजन करण्यात आल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ वापरण्यासाठी त्याला योग्य वाटतील अशा रकमा, अनुदानाच्या स्वरूपात आयोगाला देईल.

(२) आयोगास, या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा रकमा खर्च करता येतील आणि अशा रकमा पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून देय असलेला खर्च म्हणून समजण्यात येतील.

राज्य शासनाकडून अनुदाने. **२८.** (१) राज्य शासन, विधानमंडळाकडून या संबंधात कायद्याद्वारे रीतसर विनियोजन करण्यात आल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ वापरण्यासाठी त्याला योग्य वाटतील अशा रकमा, अनुदानाच्या स्वरूपात राज्य आयोगाला देईल.

(२) राज्य आयोगास, या अधिनियमाच्या प्रकरण तीन अन्वये कार्ये पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा रकमा खर्च करता येतील आणि अशा रकमा पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून देय असलेला खर्च म्हणून समजण्यात येतील.

आयोगाचे लेखे व लेखापरीक्षा. **२९.** (१) आयोग, योग्य ते लेखे आणि इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि केंद्र सरकारकडून, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक याच्याशी विचारविनिमय करून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) नियंत्रक व महालेखापरीक्षक, तो विनिर्दिष्ट करील अशा ठरावीक कालांतराने आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात झालेला कोणताही खर्च, आयोगाकडून नियंत्रक व महालेखापरीक्षकाला देय असेल.

(३) नियंत्रक व महालेखापरीक्षक, आणि आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात या अधिनियमान्वये त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना, अशा लेखापरीक्षेच्या संबंधात नियंत्रक व महालेखापरीक्षक याला सर्वसाधारणतः शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात जे अधिकार व विशेषाधिकार आणि प्राधिकार असतात, तेच अधिकार व विशेषाधिकार आणि प्राधिकार असतील आणि विशेषेकरून त्यांना पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याची मागणी करण्याचा व आयोगाच्या कोणत्याही कार्यालयांची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

(४) नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्याने या बाबतीत नियुक्त केलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांनी प्रमाणित केलेले आयोगाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह दरवर्षी आयोगाकडून केंद्र सरकारकडे पाठविण्यात येतील आणि केंद्र सरकार, लेखापरीक्षा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, तो लवकरात लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

**राज्य आयोगाचे लेखे व लेखापरीक्षा.**

**३०.** (१) राज्य आयोग, योग्य ते लेखे आणि इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि राज्य शासनाकडून, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक याच्याशी विचारविनिमय करून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) नियंत्रक व महालेखापरीक्षक, तो विनिर्दिष्ट करील अशा ठरावीक कालांतराने राज्य आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात झालेला कोणताही खर्च, राज्य आयोगाकडून नियंत्रक व महालेखापरीक्षकाला देय असेल.

(३) नियंत्रक व महालेखापरीक्षक आणि राज्य आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात या अधिनियमान्वये त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना, अशा लेखापरीक्षेच्या संबंधात, नियंत्रक व महालेखापरीक्षक याला सर्वसाधारणतः शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात जे अधिकार व विशेषाधिकार आणि प्राधिकार असतात, तेच अधिकार व विशेषाधिकार आणि प्राधिकार असतील आणि विशेषेकरून त्यांना पुस्तके, लेखे, संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्याची मागणी करण्याचा व राज्य आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

(४) नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा त्याने या बाबतीत नियुक्त केलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांनी प्रमाणित केलेले, राज्य आयोगाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह दरवर्षी राज्य आयोगाकडून राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील आणि राज्य शासन, हा लेखापरीक्षा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, तो लवकरात लवकर राज्य विधानमंडळासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण सात

## संकीर्ण

**सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.**

**३१.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमान्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात, किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, आयोग किंवा राज्य आयोग यांच्या प्राधिकाराद्वारे किंवा तद्न्वये कोणताही अहवाल किंवा पत्रिका प्रसिद्ध करण्याच्या संबंधात, केंद्र सरकार, राज्य शासन, आयोग, राज्य आयोग किंवा त्यांचा कोणताही सदस्य किंवा एकतर केंद्र सरकार, राज्य शासन, आयोग यांच्या किंवा राज्य आयोग यांच्या निदेशाखाली कृती करणारी कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही केली जाणार नाही.

**अध्यक्ष, सदस्य व इतर अधिकारी लोकसेवक असणे.**

**३२.** आयोगाचा, राज्य आयोगाचा प्रत्येक सदस्य, आणि आयोगात किंवा राज्य आयोगात, या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेला प्रत्येक अधिकारी, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. (१८६० चा ४५.)

**केंद्र सरकारकडून निदेश.**

**३३.** (१) आयोग, या अधिनियमाखालील त्याची कार्ये पार पाडताना, राष्ट्रीय प्रयोजनांशी संबंधित धोरणांच्या प्रश्नांवर केंद्र सरकार त्याला देईल, अशा निदेशांचे पालन करील.

(२) एखादा प्रश्न हा राष्ट्रीय प्रयोजनाशी संबंधित धोरणाचा प्रश्न आहे किंवा कसे, याबाबत केंद्र सरकार व आयोग यांच्यामध्ये कोणताही वाद उद्‌भवल्यास, केंद्र सरकारचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

**विवरणे किंवा माहिती.**

**३४.** आयोग, केंद्र सरकारकडून वेळोवेळी मागणी करण्यात येईल अशी आपल्या कार्याच्या संबंधातील विवरणपत्रे किंवा इतर माहिती, केंद्र सरकारला सादर करील.

**केंद्र सरकारचा नियम करण्याचा अधिकार.**

**३५.** (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी अशा नियमांमध्ये तरतूद करता येईल :—

(क) आयोगाचा अध्यक्ष व सदस्य यांच्या, कलम ६ खालील सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे वेतन व भत्ते ;

(ख) कलम १० च्या पोटकलम (४) अन्वये बैठकीचे कामकाज चालविण्यासाठी आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ग) कलम ११ च्या पोटकलम (२) अन्वये आयोगाच्या सदस्य-सचिवांनी वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कर्तव्ये ;

(घ) कलम ११ च्या पोटकलम (३) अन्वये आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अन्य अटी व शर्ती आणि ;

(ङ) कलम २९ च्या पोटकलम (१) अन्वये आयोगाने तयार करावयाचे लेखा विवरणपत्र व इतर अभिलेख यांचा नमुना.

(३) या अधिनियमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना, ठेवण्यात येईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये, याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या रूपातच परिणामक होईल, किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही, तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाअन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

राज्य शासनाचा नियम करण्याचा अधिकार.

**३६.** (१) राज्य शासनास, अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषेकरून आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी अशा नियमांमध्ये तरतूद करता येईल :—

(क) राज्य आयोगाचा अध्यक्ष व सदस्य यांच्या, कलम २० खालील सेवेच्या अटी व शर्ती आणि त्यांचे वेतन व भत्ते ;

(ख) कलम १० चे पोटकलम (४) आणि कलम २४ अन्वये, बैठकीचे कामकाज चालविण्यासाठी राज्य आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ग) कलम २१ च्या पोटकलम (२) अन्वये, राज्य आयोगाच्या सचिवाने वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कर्तव्ये ;

(घ) कलम २१ च्या पोटकलम (३) अन्वये, राज्य आयोगाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या अन्य अटी व शर्ती ; आणि

(ङ) कलम ३० च्या पोटकलम (१) अन्वये, राज्य आयोगाने तयार करावयाचे लेखा विवरणपत्र व इतर अभिलेख यांचा नमुना.

(३) या कलमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळ जेथे दोन सभागृहांचे मिळून बनलेले असेल तेथे त्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल किंवा जेथे ते एका सभागृहाचे बनलेले असेल तेथे त्या सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

३७. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, जर कोणतीही अडचण उद्‌भवली तर, केंद्र सरकारला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी आवश्यक वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी करता येतील :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर, या कलमान्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.